महाराष्ट्र शासन
**ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१.**
दुरध्वनी क्र.:- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३
website :- www.dol.maharashtra.gov.in E-Mail :- director.dol@maharashtra.gov.in

जा.क्र.: ५५/खरेदी/छपाई/दरपत्रक/२०२४-२५/५५७६ दिनांक: १३/११/२०२४

प्रति,

---------------------------
---------------------------
---------------------------

**विषय:- ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा - २०२४**
**मराठी भाषेमधील १००० प्रमाणपत्र छपाई करणेबाबतचे दरपत्रक पाठविणेबाबत.**

**संदर्भ:-** १) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र. ५५/खरेदी/शा.म.मु./छपाई/२०२४-२५/५०१२-१३, दि. १७/१०/२०२४
२) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांचे पत्र क्र. कार्या -२अ/मु-२/ प्रमाणपत्र छपाई/ (४६७)/५६६/२०२४-२५,दि. १७/१०/२०२४

**महोदय,**

वरील संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ग्रंथालय संचालनालयामार्फत जून २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा, २०२४ चा निकाल दि. २१ ऑगस्ट, २०२४ रोजी घोषित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने मराठी भाषेमधील १००० ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा प्रमाणपत्र सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्याप्रमाणे या कार्यालयास छपाई करून मिळणेबाबत दरपत्रक मागविण्यात येत आहे.

ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा प्रमाणपत्र दिलेल्या नमुन्या प्रमाणेच असावे. प्रमाणपत्र त्याच जाडीचे व आकाराचे असले पाहिजे. प्रमाणपत्राचा नमुना कार्यालयाच्या सूचना फलकावर व संचालनालयाच्या संकेत स्थळावर ठेवण्यात आलेला आहे. पुरवठादाराने यापूर्वी जर कोठे या प्रकारचे काम केले असेल, तर याची प्रत दरपत्रकासोबत जोडावी. तसेच आपल्या फर्मचे GST क्रमांक असलेले पत्रक व CMP आदाता नोंदणी प्रमाणपत्र सोबत सादर करावे. सदर कामासाठी अग्रीम रक्कम (ॲडव्हान्स) मिळणार नाही.

**त्या अनुषंगाने छापील दरपत्रक सीलबंद ग्रंथालय संचालनालयास दिनांक २१/११/२०२४ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रकातील परिमाण कमी अथवा अधिक करण्याचे, दरपत्रक मंजूर करणे / नामंजूर करणे / रद्द करणे याचे अधिकार ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत.**

आपला,

१३/११/२४

(अशोक मा. गाडेकर)
**प्र. ग्रंथालय संचालक**

**सोबत:** ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा प्रमाणपत्र नमुना
**प्रत:** सूचना फलका व संचालनालयाचे संकेतस्थळ

AnyScanner

अनुक्रमांक

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## ग्रंथालय संचालनालय

महाराष्ट्र राज्य, मुंबई

## ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा, २०

# प्रमाणपत्र

*प्रमाणित करण्यात येते की,*

*श्री. / श्रीमती/ कुमारी* ..............................................................................................

*यांनी राज्य शासनमान्य विभागीय ग्रंथालय संघद्वारा संचालित व राज्य शासन नियंत्रित ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा पाठ्यक्रम २०      या वर्षी यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे.*

*ते / त्या खालील विषय घेऊन परीक्षेस बसले / बसल्या आणि त्यांनी ............................ श्रेणी प्राप्त केली आहे.*

(केंद्र ........................................ )          (आसन क्रमांक          )

१. वर्गीकरण (तात्त्विक)          २. वर्गीकरण (प्रात्यक्षिक)

३. तालिकीकरण (तात्त्विक)          ४. तालिकीकरण (प्रात्यक्षिक)

५. ग्रंथालय व्यवस्थापन          ६. ग्रंथालय संघटन

७. संदर्भ सेवा

**संचालक,**
ग्रंथालय संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दिनांक :

SCAN AnyScanner